# मुंबई विद्यापीठ

क्र. आरइजी/आयसीसी/२०२३-२४/६

## परिपत्रक :-

विषय : प्रमोद महाजन ग्रामिण कौशल्य विकास केंद्र बाबत....

संदर्भ : मंत्री कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई यांचे दि. १७.१०.२०२३ रोजीचे पत्र

महोदय/महोदया,

सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/ कार्यक्रमाधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून वरील संदर्भीय पत्रानुसार आपणांस विदित आहे की, भारत हा जगातील सर्वात युवा देश आहे. भारतातील युवा वर्ग ही आपली खूप मोठी आणि महत्वाची साधनसंपती आहे. या युवा वर्गाला योग्य कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग अनेक योजनाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील युवक युवतींना कौशल्य प्रदान करण्यासाठी व त्यांच्यामध्ये उद्योजकता निर्माण होण्यासाठी सतत वेगवेगळया योजना राबवीत असतात.

यासाठी स्थानिक पातळीवर रोजगार व स्वयंरोजगार निर्माण व्हावा यासाठी पहिल्या टप्प्यात ग्रामीण भागात ५०० प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र सुरु करणार आहेत. याकरीता मा. प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदीजी हे गुरुवार दिनांक १९/१०/२०२३ रोजी सांयकाळी ठीक ४.०० वाजता या ५०० ग्रामीण कौशल्य विकास केंद्राचे ऑनलाईन उद्घाटन करणार आहेत. त्यावेळी आपल्या जवळच्या भागातील कौशल्य केंद्राच्या ठिकाणी उद्घाटन कार्यक्रमास आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) कार्यक्रमाधिकारी व जास्तीत-जास्त स्वयंसेवक यांना दिनांक १९/१०/२०२३ रोजी ठीक ३.३० वाजता आपण आपल्या महाविद्यालयाच्या जवळच्या कौशल्य केंद्राच्या ठिकाणी उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

सदरील वरील कार्यक्रमास आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवकांचा उपस्थिती बाबतचा अहवाल राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) कार्यालयात दि.२०/१०/२०२३ रोजी पर्यंत osd.nssmu@gmail.com या इमेल आयडीवर पाठविण्यात यावा.

(प्रा. सुनील भिरूड )
प्रभारी कुलसचिव

मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १८ ऑक्टोबर, २०२३

प्रत
सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/ कार्यक्रमाधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना

प्रत माहितीकरिता
२. स्वीय सहाय्यक (अ) कुलगुरू मुंबई विद्यापीठ, मुंबई – ४०० ०३२
(ब) प्र-कुलगुरू मुंबई विद्यापीठ, मुंबई – ४०० ०३२